# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

;महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ.

## महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

डॉ. एस. एम. रोकडे
संचालक (अतिरीक्त कार्यभार)

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली – ४४२६०५(महा.)
फोन:०७१३२.२२३३२२, २२३१०४ फॅक्स क्र ०७१३२.२२३३२२
**Email :**bcud.gondwanauniversity@gmail.com
web:gondwana.digitaluniversity.ac

जा.क्र./गो.वि.ग./एस.टी.आर.सी/68/२०१५ दिनांक : १६/०५/२०१६

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली.

**विषय:- चंद्रपूर जिल्ह्यातील गौण व वनोपज औषधी वनस्पतीचे सर्वेक्षण करण्याकरिता संशोधकाची नेमणुक करण्याबाबत.**

संदर्भ:- पत्र क्र. कक्ष-१(२)/तेंदू/४६९ चंद्रपूर दि. ०२/०५/२०१६.

महोदय,

उपरोक्त संदर्भाकिंत विषयान्वये कळविण्यात येते की, मुख्य वनसंरक्षक, चंद्रपूर वनवृत्त चंद्रपूर यांचे कडून दि. ०२/०५/२०१६ रोजी पत्र प्राप्त झाले आहे. सदर पत्रामध्ये त्यांना चंद्रपूर जिल्ह्यात आढळणारे गौण वनोपज व औषधी वनस्पतीचे सर्वेक्षण करूण किती आहेत. त्यांच्या उपलब्धतेचे प्रमाण, त्यांच्यापासून अपेक्षित उत्पन्न स्थानिकरित्या ते किती प्रमाणात संकलीत केल्या जाऊ शकते. त्यांची विक्री किती व कोणत्या प्रमाणात करण्यात येते व स्थानिक लोक त्याचा स्व:तासाठी कसा व किती उपयोग करतात या बाबतची संपूर्ण माहिती चंद्रपूर वनवृत्तास आवश्यक आहे.

या कामाकरिता वनविभागास विद्यापीठाच्या मदतीची आवश्यकता आहे. संशोधकानी वरिल आवश्यक माहिती संशोधन/संकलन करून त्या बाबतचा सर्वेक्षण अहवाल ४ ते ५ महिन्यात वनविभागास सादर करावयाचा आहे. सदर सर्वेक्षणासाठी लागणारा खर्च वनविभाग चंद्रपूर यांचे कडुन करण्यात येणार आहे.

उपरोक्त बाबींचा विचार करता संशोधनात्मक काम करण्याची सुवर्ण संधी असुन महाविद्यालयातील ज्या प्राध्यापकांना या प्रकल्पामध्ये सहभागी होण्याची इच्छा असेल त्यांनी आपला बायोडाटा व संबंधीत माहिती bcud.gondwanauniversity@gmail.com या ईमेलवर पाठवावी, ही विनंती.

**संलग्नीत:** वरिलप्रमाणे

संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
गोंडवाना विद्यापीठ
गडचिरोली (म.रा.)

OFFICE OF THE
CHIEF CONSERVATOR OF FORESTS,
CHANDRAPUR CIRCLE, CHANDRAPUR,
CIVIL LINE, NAGPUR ROAD,
CHANDRAPUR – 442401
E-mail: ccftchandrapur@mahaforest.gov.in

मुख्य वनसंरक्षक,
चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर यांचे कार्यालय
सिव्हील लाईन, नागपूर रोड, चंद्रपूर - 442401
Phone (07172) 256279, Fax 07172-252232
E-mail: ccfchandrapur@gmail.com

तात्काळ
महत्वाचे

विषय:- अकाष्ठ वनोपजांचे (गौण वनोपज) सर्व्हेक्षण करुन यादी (Inventory) तयार करणे बाबत.

क्र.कक्ष-1(2)/तेंदू/469
चंद्रपूर दिनांक :- 02.05.2016.

प्रति,
कुलगुरु,
गोंडवाना विद्यापीठ,
गडचिरोली.

चंद्रपूर जिल्ह्यांत आढळणारे गौण वनोपज व औषधी वनस्पतींचे सर्व्हेक्षण करुन ते किती आहेत त्यांच्या उपलब्धतेचे प्रमाणे किती, त्यांच्यापासुन अपेक्षीत उत्पन्न किती, स्थानिकरित्या ते किती प्रमाणात संकलीत केल्या जाऊ शकते, त्याची विक्रि किती प्रमाणात करण्यांत येते व स्थानिक लोक त्याचा स्वत:साठी किती उपयोग करतात याची एकत्रीत माहिती चंद्रपूर वनवृत्तास आवश्यक आहे. या करिता आपल्या विद्यापीठाच्या मदतीची वनविभागाला आवश्यकता आहे. या कामाकरिता आपल्या स्तरावरुन संशोधकांची नेमणूक करुन वरिल आवश्यक माहितीचे संशोधन / संकलन करुन त्याबाबतचा प्रकल्प तयार करुन या कार्यालयास देण्यांस आपणांस विनंती करण्यांत येत आहे. याकरिता लागणारा खर्च वनविभाग देण्यांस तयार आहे. सदर प्रकल्प 4-5 महिने कालावधीत पूर्ण करावयाचा आहे.

करिता आपणांस विनंती करण्यांत येते की, वरिल कामाकरिता लागणारा खर्च कळवावा व संशोधकाची नेमणूक करुन प्रकल्प तयार करुन द्यावा.

स्वा/-
मुख्य वनसंरक्षक,
चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर.

प्रतिलिपी:- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अकाष्ठ वनोपज, संनियंत्रण व मुल्यांकन) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस सादर.

स्वा/-
मुख्य वनसंरक्षक,
चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर.